# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे. 401101. दूरध्वनी क्र. 2189 2828.

जा.क्र.मनपा/परि/ 104/2018-19 दिनांक :- 17/07/2018.

प्रति,
श्री. कृष्णा सी. गुप्ता,
एस-106 पाताडीया कॉम्पलेक्स,
जनार्दन रकवी मार्ग,
उत्तन रोड, भाईंदर (प).

**विषय** :- बस स्टॉपवरील जाहिरात बाबत.

**संदर्भ** :- केंद्र शासन माहीतीचा अधिकार - 2005 अन्वये दि.21/05/2018 रोजीचा अर्ज.

**महोदय,**

| अ.क्र | ~~प्रश्न~~ मुद्दा. | उत्तर |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर क्षेत्रात असलेले सर्व बस स्टॉपची लिस्ट/ यादी देण्यात यावी. | बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करणेसाठी दिलेल्या बस स्टॉपची यादी सोबत प्रत जोडली आहे. (एकूण पृष्ठे - 02) |
| 2. | सर्व बस स्टॉप वर लावणारे जाहिरात व होर्डिंग बाबत कॉन्ट्रेक्ट / ठेकेची संपूर्ण माहिती सत्यप्रत करून द्यावी. | सोबत करारनामा प्रत देण्यात येत आहे. (एकूण पृष्ठे - 13) |
| 3. | सर्व बस स्टॉप वर ( प्रत्येकी ) कोणते जाहिरात लावणार किंवा अधिकृत आहेत त्या जाहिरतीची बस स्टॉपनुसार लिस्ट द्यावी. | अ.क्र. 1. नुसार |
| 4. | बस स्टॉपवर लागणाऱ्या जाहिरातीबाबत जर कोणतेही परिपत्रक, शासनादेश, कार्यालयीन आदेश, महासभा ठराव, GR, Guidelines असल्यास त्याची सत्यप्रत द्यावी. | मा.स्थायी समिती सभा दि.05/09/2015, ठराव प्रत व दि.17/02/2016 कार्यादेश प्रत सोबत जोडली आहे. (एकूण पृष्ठे - 02) |

Received, 17/07/18

(मृदुला अंडे)
जन माहीती अधिकारी
परिवहन उपक्रम
मिरा भाईंदरमहानगरपालिका

E:\2018-19\Mhaticha Adikar\Krishna C Gupta.docx

१६८(५)

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३१३ / २८१८४८४५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. नं. मनपा/जाहिरात/३०६/२०१५-१६ दिनांक : १७/२/२०१६

## // कार्यादेश//

प्रति,
मे. आदित्य ॲडव्हर्टायझर्स
बी/१०२, रिद्धीसिद्धी कॉम्प्लेक्स,
एम.जी.रोड. बोरिवली (पुर्व)
मुंबई -४४० ०६६.

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करणे तसेच बस थांब्याची देखभाल दुरुस्ती करणेबाबत.**

**संदर्भ :- दि. १५ /०२/२०१६ रोजीचा करारनामा.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करणे तसेच बस थांब्याची देखभाल दुरुस्ती करण्याकरीता महानगरपालिकेने आपणाबरोबर दि. १५/०२/२०१६ रोजी केलेल्या करारनाम्यातील आणि निविदेतील अटीशर्तींच्या अधिन राहुन आपणांस बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करणे तसेच बस थांब्याची देखभाल दुरुस्ती करणे करीता कार्यादेश परवानगी खालील अटीशर्तींच्या अधिन राहुन देण्यांत येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निविदे पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या जागेवरती महानगरपालिकेच्या बस थांब्यावरील जाहिरात फलकांवर २ वर्ष कालावधी करीता जाहिरात प्रदर्शित करणे बाबत सदर ठेका देण्यांत येत आहे, तसेच मा.आयुक्त सो., यांनी सदरचा करारनामा रद्द करणे, वाढीव मुदत देणे, नुतनीकरण करुन देणेकरीताचे अधिकार राखून ठेवले आहेत.

२) महानगरपालिकेबरोबर करारनामा केल्यानंतर, तसेच कार्यादेश प्राप्त झाल्यापासुन सात दिवसानंतर पहिल्या दिवसापासुन बस थांब्याची जाहिरात फी वार्षिक महसुल रक्कम लागु होईल.

३) नगरसेवक /आमदार /खासदार यांचे निधितुन उभारले गेलेले बस थांब्यांवर त्या संबंधित नगरसेवक/ आमदार/ खासदार यांचे नावाचा २ X १ चौ.फुट आकारमानाचा फलक लावणे बंधनकारक असेल.

४) करारनामा केल्यापासुन व कार्यादेश मिळाल्यापासून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नावाने ३० महिन्यांच्या मुदतीकरीता वैध असलेली प्रतिभुती ठेव (Security Deposit) रोख स्वरुपात शेड्युल बँक किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटी स्वरुपात सात दिवसांत महानगरपालिकेच्या जाहिरात विभागात जमा करण्यांत यावी. तसेच सात दिवसांच्या आत बस थांब्यावरील जाहिराती करीता प्रथम (प्रथम हप्ता) अर्धवार्षिक महसूल रक्कम महानगरपालिका फंडात भरण्यात यावी.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेले आदेश व सुचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

Received
[signature]

[signature] १५/२/२०१६
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

४३७/५

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि.०५/०९/२०१५

प्रकरण क्र. ७८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणे कामाच्या निविदा मंजुरीबाबत.

ठराव ७४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या जागेवरील महानगरपालिका बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी, तसेच सदर बस थांब्याची देखभाल दुरुस्ती करण्याकरीता कंत्राटदार नियुक्ती करण्याबाबत कामाची फेर निविदा दि.०३/०७/२०१५ रोजी दै. आफटरनून व थाने की आवाज या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द केली होती तसेच online e-tendering द्वारे https://mbmc.eproc.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०३/०७/२०१५ ते दि.१०/०७/२०१५ या कालावधीमध्ये फेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीमध्ये **Tender ID - 23081** यामध्ये मे. आदित्य ॲडव्हटायजर्स, मे. मुद्रा आर्टस व मे. विहंग फॅसीलिटी सर्विसेस या तीन निविदाधारकांनी निविदेत मागविलेल्या (आवश्यक असणारी) **(Technical Bid)** मधील अटीशर्तीची पुर्तता केलेली असल्याने मा. निविदा निवड समितीने दराचा देकार **(Financial Bid)** उघडण्यास दि.३१/०७/२०१५ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाच्या दराचा देकार **(Financial Bid)** दि.३१/०७/२०१५ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार निविदाधारकांनी सादर केलेल्या वार्षिक दराबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी दि.२४/०८/२०१५ रोजी मा. निविदा निवड समितीने मे. आदित्य ॲडव्हटायजर्स यांनी सादर केलेले दर हे मे. मुद्रा आर्टस व मे. विहंग फॅसीलिटी सर्विसेस यांनी सादर केलेल्या दरापेक्षा अधिक आहेत. तसेच महानगरपालिका निर्धारीत मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा अधिक असल्याने मे. आदित्य ॲडव्हटायजर्स यांचे वार्षिक दर मा. निविदा निवड समितीने मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | महानगरपालिकेने निर्धारित वार्षिक मुल्याधिकारी रक्कम | मे.आदित्य ॲडव्हटायजर्स | मे. मुद्रा आर्टस | मे. विहंग फॅसीलिटी सर्विसेस |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | ५,०६,०६४/- | ५,६७,०००/- | ५,१०,०००/- | १,११०/- |
| द्वितीय वर्ष | ५,५६,६७०/- | ६,२३,७००/- | ५,६५,०००/- | १,२२१/- |
| एकुण | १०,६२,७३४/- | ११,९०,७००/- | १०,७५,०००/- | २,३३१/- |
| मागणी पेक्षा जादा रक्कम | | १,२७,९६६/- | १२,२६६/- | -- |

तरी वरील तक्ता पाहता मे. आदित्य ॲडव्हटायजर्स यांचे सादर दर हे वार्षिक मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा अधिक असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करणे कामाचा ठेका मे. आदित्य ॲडव्हटायजर्स यांना दोन वर्ष कालावधी करिता देणेस तसेच तदनंतर काम समाधानकारक असल्यास आणि निविदेतील व करारातील अटीशर्तीचे पालन परिपुर्ण केल्यास व वेळेत महसूलाचा भरणा केल्यास प्रत्येक वर्षी वार्षिक महसूल रक्कमेवर १० टक्के अधिक वाढीने पुढील दोन वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी. तसेच भविष्यात बस थांब्याची संख्या वाढल्यास त्याच्यावर जाहिरात करणेस व जे दर लागु असतील त्या दराने बस थांब्यावर जाहिरात प्रसिध्द करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Nayana Vasani, ५/९/२०१५, Dr. Nayana Vasani

अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर

सत्य प्रत

ठराव सर्वानुमते मंजुर

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\Madhuri\Jahirat\Sthayi samiti - Goshvara.doc

४६०(४)

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ©2015© PB 521770

DIST. TREASURY OFFICE ... NE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
- 6 FEB 2016
मुद्रांक प्रमुख लिपीक/लिपीक

# // करारनामा //

## बस थांब्यावरील जाहिरात अधिकार देणे करीताचा करारनामा

हा करारनामा मुक्काम भाईंदर, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक --९४----

माहे -------फेब्रुवारी--------- सन २०१६ रोजी.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (प.)

प्रथम पक्षकार
(यानंतर एम.बी.एम.सी. असे संबोधण्यात येईल.)

आणि

मे. आदित्य ॲडव्हर्टायझर्स
बी/१०२, रिद्धीसिद्धी कॉम्प्लेक्स,
एम.जी.रोड., बोरिवली (पुर्व), मुंबई -४४० ०६६

द्वितीय पक्षकार
(यानंतर लायसेन्सी /ठेकेदार/बिडर्स असे संबोधण्यात येईल.)

आयुक्त (मिरा भाईंदर महानगरपालिका) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत स्थापन केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, तालुका व जिल्हा ठाणे करीता आणि वतीने (यानंतर सदर **'एम.बी.एम.सी.'** असे संबोधण्यात आले आहे.) (ज्याचा अर्थ

४६२

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2015 © PB 521771

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 6 FEB 2016

मुद्रांक प्रमुख लिपीक/लिपीक

आणि संदर्भास बाधा होत नसल्यास त्या त्या वेळी उप-आयुक्तांचे कार्यालयाचा पदभार सांभाळणारे त्यांचे उत्तराधिकारी आणि असाईनीज (अभिहस्तांकिती) यांचा सुध्दा समावेश असल्याचे मानले जाईल) ते प्रथम पक्षकार आणि मे. आदित्य ॲडव्हर्टायझर्स सर्व्हिस टॅक्स (नोंदणी क्रमांक AIDPP4356MST001) आणि कार्यालय बी/१०२, रिद्धीसिद्धी कॉम्प्लेक्स, एम.जी.रोड, बोरिवली पुर्व, मुंबई ४०० ०६६. या ठिकाणी आहे यानंतर सदर **'लायसेन्सी'** (कन्सेशनरी) असे संबोधण्यात आले आहे. (ज्याचा अर्थ आणि संदर्भास बाधा होत नसल्यास सदर फर्मचे सध्याचे भागीदार आणि अखेरचे उत्तरजीवी भागीदारांचे वारसदार, कारभारी यांचा सुध्दा समावेश असल्याचे मानले जाईल.) ते द्वितीय पक्षकार, यांच्या मध्ये निष्पादीत करारनामा करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (कायदा) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका ही रस्ते, फरसबंदी पायरस्ते वगैरे सारख्या सार्वजनिक मालमत्तेची मालक आणि परिक्षक असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ आणि २४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण नियम) २००३ अन्वये कोणाही इच्छुक पक्षकार यांना जाहिरातीचे अधिकार देवू शकते. एम.बी.एम.सी. ची ही इच्छा निविदा सुचना रुपाने वर्तमान पत्रांत प्रसिध्द करण्यात आली, ज्याद्वारे विशिष्ट मोजमाप, आकारातील पुर्वनिश्चित केलेल्या माध्यमातील जाहिराती विशिष्ट ठिकाणी प्रदर्शित करण्याचे अधिकार देण्याकरीता ई टेंडरींगद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्याअर्थी, सदर महापालिका ही महानगरपालिकेच्या बस थांब्यावर जाहिरात प्रसारीत करण्याचे हक्क प्रदान करण्यासाठी तसेच सदर बस थांब्याची देखभाल दुरुस्ती करण्याकरीता व जाहिरात फलकांवर जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी देण्यात आलेली स्थाने/जागांची एकमेव कायदेशिर कब्जेदार आणि धारक अथवा पुरेशी अधिकार आहे.

DPallal

जाहिरात प्रदर्शित करणे करीता ठराविक/विनिर्दिष्ट ठिकाणी जाहिरात प्रदर्शित करण्याचे अधिकार प्रदान करणे करीता सादर केलेली

ऑफर/निविदेचा स्वीकार करून मान्यता दिली आहे. (सदर लायसन्सी यांना मंजूर झालेल्या बस थांब्याची यादी या करारनाम्यासोबत "जोडपत्र-अ" म्हणून संलग्न केली आहे.)

आणि ज्याअर्थी यांतील पक्षकार यांनी आपसांत मान्य केलेल्या अटी आणि शर्ती खालील नुसार लेखी नोंद करण्याचे मान्य केले आहे.

DPallal

# अटी व शर्ती

१) **कराराच्या सर्वसाधारण अटी :-**

अ) **कराराची व्याप्तीः** - २ वर्ष (मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निविदे पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या जागेवरती महानगरपालिकेच्या बस थांब्यावरील जाहिरात फलकांवर जाहिरात प्रदर्शित करणे करीता, तसेच मा.आयुक्त सो., यांना सदरचा करारनामा रद्द करणे, वाढीव मुदत देणे, नुतनीकरण करून देणेकरीताचे अधिकार राखून ठेवले आहेत. सदर ठेकेदार यांनी २ वर्षामध्ये भरणा करावयाचा महसूल रक्कम वेळोवेळी भरल्यास व अटीशर्तीचा कोणताही भंग न केल्यास व त्यांचे काम महानगरपालिकेस समाधानकारक वाटल्यास मा.आयुक्त सो., यांच्या मंजुरीने पुढील २ वर्षाची मुदतवाढ मिळू शकेल. परंतु मुदतवाढीस मंजुरी देण्याकरीता महापालिका आयुक्त बंधनकारक राहणार नाही.

ब) करारनामा निविदा दस्तावेजात नमुद केल्याप्रमाणे बस थांब्यावरील जाहिरात फलकाच्या माध्यमाने ठराविक / विनिर्दिष्ट ठिकाणी जाहिराती प्रदर्शित करण्याचे अधिकार प्रदान करण्यासाठी आहे.

क) विनिर्दिष्ट केलेल्या बस थांब्या व्यतिरिक्त कोणत्याही अतिरिक्त जागा किंवा ठिकाणांचा वापर केल्यास, अशावेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी या निविदेच्या नियमांचे उल्लघंन केले आहे असे मानून एम.बी.एम.सी. ही मा. आयुक्त/उपआयुक्त, एम.बी.एम.सी. यांनी निर्देशित केलेली कारवाई करील, जी अंतिम कारवाई असेल.

२) **कराराचा कालावधी आणि सुरुवात :-**

लायसेन्सी/ठेकेदार यांनी बस थांब्यावरील फलकांवर जाहिराती प्रसिध्द करण्यासाठीच्या कराराचा कालावधी दोन वर्षाकरीता असेल. (निविदा संचातील अट क्र.६ नुसार पालन करुन व वेळोवेळी मनपाची होणारी महसूल रक्कम भरल्यास.)

३) **जाहिरातीची साधणे उभारणे व काढून टाकणे :**

अ) लायसेन्सी/ठेकेदार हे जाहिरात माध्यमाचे फलक/ग्लोसाईन्स/इलेक्ट्रॉनिक बोर्डस वगैरे किंवा एम.बी.एम.सी. ने तिच्या सल्लागारांद्वारे दिलेले विनिर्देश आणि स्थाने यानुसार त्यांना प्रदान करण्यांत आलेली जाहिरातीची माध्यमे किंवा साधणे उभारणे/काढून टाकणे/प्रसिध्द करणे यासाठी सक्तीने जबाबदार असतील. तसेच कोणत्याही कारणास्तव एम.बी.एम.सी. ला सदर माध्यम (मिडीया) काढून टाकावयाचे असल्यास सदर वेळी लायसेन्सी/ठेकेदार ते काढून टाकतील, या बाबतीत सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना त्याकरीता कोणत्याही मोबदल्याचा दावा करणेस अधिकार राहणार नाही.

ब) अशा प्रकारचे जाहिरातीची माध्यमे उभारताना किंवा काढून टाकताना एम.बी.एम.सीच्या मालमत्तेस काही नुकसान झाल्यास लायसेन्सी/ठेकेदार हे एम.बी.एम.सी. च्या समाधानार्थ त्याची पुनःस्थापना करतील. आणि सदर पुनःस्थापना किंवा दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर लायसेन्सी/ठेकेदार हेच करतील. व एम.बी.एम.सी. ही सदर दुरुस्ती/पुनःस्थापने करीता कोणतीही रक्कम सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना देणार नाही.

४) **देखभाल व दुरुस्ती :**

या कराराचे मुदतीत सदर लायसेन्सी यांनी लावलेले जाहिरातींचे फलक/ग्लोसाईन्स/इलेक्ट्रॉनिक बोर्डस वगैरे आणि ज्या बस थांब्यांवर लावण्यांत आलेले आहेत, त्या बस थांब्यांची देखभाल व दुरुस्ती महापालिकेच्या समाधानार्थ करण्याची जबाबदारी लायसेन्सी/ठेकेदार स्विकारीत असून सदर देखभाल व दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर लायसेन्सी/ठेकेदार करतील.

५) **अपघात व हानी :**

अ) बस थांब्यांच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही कारणांमुळे जाहिरातीचे फलक/ ग्लोसाईन्स/इलेक्ट्रॉनिक बोर्डस् इत्यादींमुळे कोणतीही जिवित हानी वा वित्त नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी लायसेन्सी/ठेकेदार स्विकारतील आणि त्यांचे स्व:खर्चाने त्या नुकसानीची किंवा हानीची भरपाई करुन देतील.

ब) लायसेन्सी/ठेकेदार असे मान्य करतात की, महापालिकेकडून नोटिस मिळाल्यावर सदर नोटिस मिळाल्यापासून तीन दिवसांत सदर जाहिरातीची माध्यमे फलक /बोर्डस/ग्लोसाईसन/इलेक्ट्रॉनिक बोर्डस प्रदर्शित करणे, याबाबत झालेल्या दोषांची/कसुरांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ स्वत:चे खर्चाने करतील. आणि तसे न केल्यास महानगरपालिका ही कोणतीही पुढील नोटिस किंवा सुचना न देता सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचेच खर्चाने आणि जबाबदारीवर सदर आवश्यक असलेले काम करणेंस मुक्त राहील.

६) **संबंधित प्राधिकरणांची परवानगी :**

सदर लायसेन्सी/ठेकेदार एम.बी.एम.सी. च्या सहपत्र-२ मधील कार्यक्षेत्रात (नमुद ठिकाणे) जाहिराती फलक लावणेकरीता संबंधित सक्षम प्राधिकारणांची परवानगी/परवानग्या मिळवतील. सदर परवानग्या मिळविणे करीताचे होणारे खर्च आणि त्याचे शुल्क सदर लायसेन्सी/ठेकेदार हेच अदा करतील.

७) **जाहिरात मजकुरास मान्यता देणे :-**

अ) लायसेन्सी हे असे मान्य करतात की, ते जाहिरात प्रदर्शित करणेपुर्वी सदर जाहिरातीचा मजकूर प्रथम महानगरपालिकेच्या मान्यतेकरीता सादर करतील .

ब) महानगरपालिकेच्या परवानगीने लायसेन्सी/ठेकेदार यांना सदर कराराच्या काळात प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीच्या मजकुरात कोणताही सुधार/फेरफार करता येईल.

८) **आक्षेपार्ह जाहिराती आणि जाहिरातीचे निष्कासन :**

अ) कोणतीही आक्षेपार्ह जाहिरात बस थांब्यांवर प्रदर्शित केली जाणार नाही आणि या कलमाचे अर्थामध्ये काय आक्षेपार्ह आहे या बाबतचा महानगरपालिकचा निर्णय अंतिम असेल, जो लायसेन्सी यांचेवर बंधनकारक राहील. न दिसणारी/अव्यवस्थित /असुरक्षित जाहिराती तसेच वाहतुक नियंत्रणास बाधक ठरणा-या जाहिराती, कायदयाचे उल्लघंन करणा-या किंवा जनतेच्या धार्मिक भावना दुखावतील अशा जाहिराती, तसेच राष्ट्रीय/राजकीय नेत्यांचे फोटो वापरुन केलेली मानहानीकारक जाहिराती किंवा कायदयाने बंदी केलेल्या बोधचिन्हांचा वापर करुन केलेल्या जाहिराती वगैरे हया आक्षेपार्ह जाहिराती मानल्या जातील.

ब) आक्षेपार्ह अशी कोणतीही बस थांब्यांवरील जाहिरात महानगरपालिका २४ तासाची नोटीस देऊन लायसेन्सी/ठेकेदार द्वारे त्वरीत काढण्यात येतील. आक्षेपार्ह जाहिरात न काढल्यास मनपा कडुन काढण्यात येतील व त्याचा सर्व खर्च ठेकेदाराकडुन वसुल केला जाईल.

क) जाहिरातीचे प्रदर्शना संबंधात कोणीही व्यक्ती किंवा प्राधिकारणांनी केलेल्या कोणत्याही प्रकारची कारवाई अथवा कारवाहीकरीता लायसेन्सी/ठेकेदार हेच जबाबदार राहतील. आणि सदरची कारवाई, खर्च, दावे, आणि या कराराअंतर्गतचे परिणांमापासून लायसेन्सी/ठेकेदार महानगरपालिकेस दोषमुक्त ठेवतील.

९) कराराचे तसेच नियम आणि विनियमांचे अनुपालन करणे :

अ) सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी या करारानुसार कोणतीही बाब करणेस नकार दिला किंवा हयगय केल्यास अशावेळी महानगरपालिका सदरचे काम करणेसाठी लायसेन्सी/ठेकेदारां ना नोटिस देईल. आणि तरीही सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी तशी कामे करणेची हयगय केली किंवा नकार दिल्यास अशावेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचेद्वारे पुढे करण्यांत आलेली हयगय किंवा नकारासंबंधात करावयाच्या कारवाई बाबतचे तिचे कोणत्याही अन्य अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचेकडून त्या संबंधातील खर्च वसूल करणेस मनपास अधिकार राहील.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यात विकास कामामध्ये बस थांब्याचा अडथळा निर्माण होत असल्यास, सदरच्या जागेतील बस थांबा रद्द किंवा स्थलांतर करणे हा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवला आहे. तो निर्णय अंतिम राहील व तो निर्णय लायसेन्सी/ठेकेदार यांस बंधनकारक असेल.

क) लायसेन्सी/ठेकेदार मान्य करतात की, भविष्यांत महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारद्वारे करण्यांत येणारे सुधार,बदल किंवा फेरफारांचे अनुपालन करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत.

ड) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५६ अ च्या पोट कलम (१) यासह आणि कलम २४४ व २४५ या द्वारे शासनाने प्रदान करण्यात आलेल्या व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ चे काटेकोर पणे पालन करण्याची जबाबदारी लायसेन्सी/ठेकेदाराची राहील.

१०) सर्व दावे, कारवाई नुकसानाबाबत लायसेन्सी/ठेकेदार यांची जबाबदारी :

अ) या कराराद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या बस थांब्यावरील जाहिरात प्रदर्शनाचे अधिकारांची अंमलबजावणी करतांना निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई, मागण्या, नुकसान, याबद्दल सर्वस्वी जबाबदारी लायसेन्सी/ठेकेदार यांची राहील.

ब) बस थांब्यावर फलक/ग्लोसाईन/इलेक्ट्रॉनिक बोर्डस वगैरे उभारतांना किंवा काढून टाकताना किंवा इलेक्ट्रीक शॉक लागून किंवा जाहिरातींचे फलक /साईनबोर्ड उडून जाणे वगैरे पासून कोणाही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर लायसेन्सी/ठेकेदार हे एकटेच जबाबदार राहतील. आणि अशा प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष झालेल्या जिवित किंवा मालमत्तेच्या हानीपासून सदर लायसेन्सी/ठेकेदार हे महानगरपालिकेस पुर्णतः दोषमुक्त ठेवतील.

क) या कराराचे मुदतीत कोणत्याही वेळी संप, टाळेबंदी, साहित्याचा तुटवडा, युध्द, आग, पुर, भुकंप, वादळ, व अन्य नैसर्गिक आपत्ती किंवा कोणतीही सरकारी अधिनियमिती किंवा विनिमय किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाबाहेरील अशा कोणत्याही इतर कारणास्तव या करारात नमुद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार कराराची पुर्तता करणे अशक्य झाल्यास सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना कराराची पुर्तता करणेंस झालेली असमर्थता या संबंधात महानगरपालिकेकडे कोणताही दावा करणेचा अधिकार राहणार नाही. व त्याबद्दलचे नुकसान मनपाकडे मागता येणार नाही.

११) अधिदानाच्या / महसूलाच्या (Payment) अटी व अनुसूची :-

अ) सदर लायसेन्सी/ठेकेदार हे महानगरपालिकेस प्रती वर्षी होणारा वार्षिक महसुल दोन समान अर्धवार्षिक हप्त्यात निश्चित केल्यानुसार देतील. (महसूल वार्षिक शुल्काची ५० टक्के रक्कम करारनामा अंतिम केल्यापासून ७ दिवसांत (सुट्टीचे दिवस वगळून) जमा करावी लागेल. आणि तसे न केल्यास निविदा रद्द होणेस पात्र राहील.) त्यानंतर प्रत्येक ६ महिन्यांची देकाराची रक्कम एका हप्त्यात देय तारखेस किंवा त्यापूर्वी अदा करावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत देकार रक्कम देय तारखेपूर्वी भरणे बंधनकारक राहील. कराराचा कालावधी मधील देय तारखेस देय हप्त्याचे आगाऊ धनादेश (एकुण ४) कार्यादेश मिळाल्यापासुन ७ दिवसांत जमा करणे बंधनकारक आहे.

ब) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार व निविदेत दर्शविलेल्या (बीड बी) महसूल रक्कमेचा लायसेन्सी/ठेकेदार हे खालील दर्शविलेल्या वार्षिक रक्कमेनुसार मनपामध्ये भरणा करतील.

| कालावधी | वार्षिक दर्शविलेली महसूल रक्कम (रु.) | अर्धवार्षिक रक्कम | महसुल कालावधी दिनांक |
|---|---|---|---|
| १ वर्ष | रु. ५,०६,०६४/- | २,८३,५००/- | |
| | | २,८३,५००/- | |
| २ वर्ष | रु. ५,५६,६७०/- | ३,११,८५०/- | |
| | | ३,११,८५०/- | |
| एकूण | ११,९०,७००/- | ११,९०,७००/- | |

(सर्व अधिदाने/महसूल रक्कम (Payment) ही रोख किंवा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाने कोणत्याही शेडयुल/राष्ट्रीयकृत बँकेवर काढलेल्या **'अकाऊंट पेयी ओन्ली'** धनादेशाद्वारे देण्यात यावी.)

क) सदर कराराचे मुदतीत सदर लायसेन्सी/ठेकेदार हे महानगरपालिकेच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही अदृश्य कारणांपासून किंवा अन्य आधारांवर काम करण्यास अडथळा निर्माण होण्याच्या कोणत्याही कारणांस्तव असल्यास, कोणताही दावा महानगरपालिकेकडे करणेस अधिकार राहणार नाहीत.

ड) ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे लायसेन्सी/ठेकेदार यांनी महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास, महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाययोजना खुल्या असल्यातरी सदर लायसेन्सी/ठेकेदार हयांनी भाडे रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यत (दोन्ही दिवस मिळून) दरसाल १८% द.सा.द.शे. दराने व्याज दयावे लागेल. आणि अशी रक्कम एक महिन्यापेक्षा जास्त काळ स्वत:कडे ठेवल्यास किंवा अदा न केल्यास महानगरपालिकेस सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार राहील. आणि अशावेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी जमा केलेली प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा इसारा रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील.

इ) सदर लायसेन्सी/ठेकेदार हे ठेक्याचे काम सुरु करु शकले नाहीत, आणि पहिल्या अर्धवार्षिक भाडयाची रक्कम ठेका सुरु होण्यापुर्वी देण्यात कसुर केल्यास, महानगरपालिकेस सदर करारनामा रद्द करण्याचा अधिकार राहील.

**१२) लायसेन्सीची दिवाळखोरी किंवा लायसेन्सीद्वारे कराराच्या अटींचे पालन न करणे :-**

सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी दिवाळखोरीची कोणतीही कृती केली किंवा दिवाळखोर घोषित झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द विघटनाची कारवाई केली गेली किंवा स्वत: किंवा न्यायालयाचे निर्देशांना अधीन राहून केलेले विघटन किंवा लायसेन्सी/ठेकेदार यांना या करारा अंतर्गतचे देय रकमेबाबत जप्ती कारवाईंचा सामना करावा लागल्यास किंवा महानगरपालिकेस देय असणा-या रकमांचा भार सदर करारावर किंवा ठेक्यावर आल्यास किंवा त्यांचे क्रेडीटर्स बरोबर समेट केल्यास किंवा सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी या करारातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील अटी आणि नियमांचे पालन करणेत कसुर केली तर अशावेळी महानगरपालिका ही सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचेद्वारे झालेले उल्लघंन किंवा कसुर याकरीता भाडे किंवा मोबदला रुपाने किंवा नुकसान म्हणून सर्व रकमा वसूल करणेंच्या तिच्या अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार राहील.

१३) **प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट)**

एम.बी.एम.सी. यांचेकडून कार्यादेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत यशस्वी लायसेन्सी/ठेकेदार (बिडर्स) हे एम.बी.एम.सी. ला प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) अदा करतील. सदर प्रतिभूती ठेव रक्कम ही लायसेन्सी/ठेकेदार यांनी दुसऱ्या वर्षाकरीता दिलेल्या वार्षिक महसूल रक्कमेच्या १०० टक्के समान इतकी असेल. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) रोख स्वरुपात राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेच्या बॅक गॅरंटी स्वरुपात एम.बी.एम.सी. यांचे नावांने देतील. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) ही ३० महिन्यांकरीता वैध असेल. (पुढील २ वर्षाची मुदतवाढ किंवा इतर कालावधीकरीता मुदतवाढ दिल्यास ठेकेदारास वरील नमुद रक्कमेची प्रतिभुती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) महानगरपालिकेस जमा करणे बंधनकारक राहिल.)

१४) **प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) परत करणे :-**

प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर कराराच्या अटीची पूर्णपणे पूर्तता झाल्यानंतर तसेच एम.बी.एम.सी. ची कोणतीही देय रक्कम शिल्लक नसल्यास किंवा त्यावर कोणताही दावा नसल्यास मागणी केल्यानंतरच सदर प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) परतावा करण्यात येईल.

१५) **प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जप्त करणे :-**

अ) संपुर्ण प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा कोणताही भाग हा सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी सदर कराराच्या अटी आणि शर्तीचे पालन करणे कसूर केल्यास किंवा त्याच्या आवश्यकताची पुर्तता /पालन न केल्यास सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचे विरुध्द महानगरपालिकेस असलेले दावे व अधिकार यांना कोणतीही बाधा न आणता ती प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा भाग हा जप्त होणेस पात्र असेल.

ब) कोणत्याही वेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार एम.बी.एम.सी. ची फसवणुक करणेच्या हेतूने एकाच वर्ग/बस थांब्यावरील जाहिराती करीता वेगवेगळ्या नावांने बिडच्या किंमतीत हातचलाखी करुन किंवा किंमत कमी जास्त दाखवून निविदा सादर केल्याचे आढळून आल्यास अशावेळी त्यांच्या सर्व निविदा रद्द केल्या जातील. तसेच करारनामा रद्द करुन त्यांची इसारा रक्कम (EMD) प्रतिभूती ठेव (Security Deposite) जप्त करण्यात येईल.

१६) **कंत्राटदाराची सर्व धोक्याबाबतची विमा पॉलीसी :-**

कंत्राटदाराने संपूर्ण निविदेतील कालावधीसाठी विमा पॉलीसी घेणे त्याच्या हिताची असेल. अशी पॉलीसी घेण्यासाठी येणारा खर्च व हप्त्याची रक्कम ही कंत्राटदारास भरावी लागेल. घेण्यांत आलेल्या पॉलीसीची प्रत महानगरपालिकेकडे देणेत यावी.

१७) **लायसेन्सीच्या सर्व जबाबदारीचे धोरण (सी.ए.आर.) :-**

सदर लायसेन्सी/ठेकेदार हे बस थांब्यावरील जाहीराती प्रदर्शित करण्या संबंधातील कामांपासून एम.बी.एम.सी. यांचे मिळकतीस कोणतीही हानी, नुकसान होणे किवा व्यत्यय निर्माण होणे किंवा सदर कामाकरीता कर्तव्यावर असलेल्या किंवा त्यांनी नियुक्त केलेले कामगार यांना कोणतीही हानी दुखापत नुकसान होणे तसेच वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाईची मागणी यापासून एम.बी.एम.सी. यांना सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची याद्वारे हमी देत आहेत. आणि अशाप्रकारे सदर ठेकेदार यांचे मालकीच्या जाहिरात साहित्यास सदर कारणांपासून कोणतीही हानी किंवा नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी एम.बी.एम.सी. स्विकारणार नाही.

१८) क्षतिपूर्ती (इन्डेमनीटी) :-

अ) सदर लायसेन्सी/ठेकेदार हे प्रश्नाधिन माध्यमाद्वारे जाहिराती प्रदर्शित करण्याच्या कामांपासून एम.बी.एम.सी. यांचे कोणत्याही मालमत्तेस हानी किंवा नुकसान होणे किंवा वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाई मागणी यापासून किंवा कोणाही अन्य व्यक्तींचा मृत्यू अंपगत्व किंवा दुखापत यापासून निर्माण होणारे दावे यापासून एम.बी.एम.सी. ला सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहोत. आणि सदर संबंधातील सर्व खर्च, आकार किंवा दाव्याचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन सदर लायसेन्सी/ठेकेदार हे एम.बी.एम.सी. ने मागणी केल्यावर त्याची तात्काळ भरपाई करुन देतील.

ब) लायसेन्सी/ठेकेदार यांचेद्वारे झालेल्या कायदयाच्या उल्लघंनापासून एम.बी.एम.सी. यांना दोषमुक्त ठेवणे. लायसेन्सी/ठेकेदार यांचेकडून सदर कराराच्या किंवा ठेक्याच्या मुदतीत कायद्याच्या विरुध्द असतील अशा जाहिराती प्रदर्शित करण्यासंबंधात राज्य किंवा केंद्रसरकार किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियम वगैरेचे उल्लघंन झाल्यामुळे आकारण्यात किंवा लादण्यात येणारे दंड, शिक्षा, आणि इतर खर्च वगैरे पासून एम.बी.एम.सी. यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहेत.

क) सदर लायसेन्सी/ठेकेदार हे सर्व कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲन्ड ऑपरेशन) कायदा व नियम तसेच मिनिमम वेजेस ॲक्ट, बाल मजुर कायदा, इतर लेबर लॉ यासहित सर्व संविदा नियमांचे पालन करतील आणि सदर कायद्यापासून निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई यापासून एम.बी.एम.सी. यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवतील.

१९) लायसेन्सी यांना महानगरपालिकेचे सहाय्य :-

महानगरपालिका सदर ठेकेदार/लायसेन्सी यांचेबरोबर अशी संविदा करते की, सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी या करारातील सर्व अटी आणि शर्तीचे पालन केले आणि सर्व देय रकमा अदा केल्यावर ते कोणत्याही अडथळा किंवा व्यत्ययविना जाहिरातीचे फलक लावणेस अधिकार राहील. परंतु अट क्र.१.७ - अ चे पालन करून आणि जेथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी सदर महानगरपालिका लायसेन्सी/ठेकेदार यांचे स्वखर्चाने सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचे अधिकारांना अडथळा किंवा व्यत्यय निर्माण करणारे किंवा हस्तक्षेप करणारे व्यक्तीविरुध्द योग्य कारवाई करणेंस सहकार्य करील.

२०) ठेका रद्द करण्याची नोटिस :-

अ) सदर करार/ठेक्याच्या मुदतीत सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचे व्यवस्थापन किंवा प्रतिनिधी यांचे बाबत महानगरपालिका असमाधानी होईल असे कोणतेही कारण घडल्यास अशावेळी सदर महानगरपालिका ही लायसेन्सी/ठेकेदार यांना लेखी नोटिस देवून सदर नोटिसमध्ये नमुद केलेल्या असमाधानाबाबतच्या त्रुटीचे खुलासा करणेंस सांगेल. सदर लायसेन्सी/ठेकेदार हे नोटिस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या काळात अशा असमाधानाबाबतच्या कारणांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ दूर करु शकले नाहीत. तर अशावेळी याउलट सदर करारात काहीही नमुद केले असले तरी महानगरपालिकेस लायसेन्सी/ठेकेदार यांना १५ दिवसांची पुर्व नोटिस देऊन सदर करारनामा रद्द करण्याचा एम.बी.एम.सी.ला अधिकार राहतील.

ब) पहिला महसुलाचा हप्ता देण्यास कसूर केल्यास किंवा सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी माघार घेतली किंवा ठेका सुरु केला नाही. अशावेळी लायसेन्सी/ठेकेदार यांना एक महिन्याची पुर्व लेखी सुचना देवून ठेका रद्द करणेचा अधिकार असेल आणि सदर सुचनेचा काळ संपल्यावर सदर करारनामा रद्द होईल. आणि सदर लायसेन्सी/ठेकेदार यांची ई.एम.डी. किंवा प्रतिभूती ठेव रक्कम किंवा दोन्हीही जप्त केल्या जातील.

क) सदर लायसेन्सी/ठेकेदार यांनी करारातील कोणत्याही अटीचे उल्लघंन केले किंवा एम.बी.एम.सी. यांना देय असलेली रक्कम देणेस कसुरवार ठरल्याने, कायद्याने तो त्याची कर्ज चुकती करू शकत नाही असे मानले गेल्यास म्हणजेच दिवाळखोर घोषित केल्यास किंवा सदर कंपनीचे व्यवहारांचे समायोजनाबाबत ठराव मंजुर किंवा पास करण्यात आल्यास किंवा एम.बी.एम.सी. यांच्या लेखी पुर्व मान्यतेविना सदर ठेका सुपुर्द हस्तांतरण किंवा पोटभाडयाने दिल्यास अशावेळी एम.बी.एम.सी. ही सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना नोटिस देवून सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना या कराराअंतर्गतच्या कोणत्याही जबाबदारी किंवा दायित्वापासून मुक्त न करता किंवा एम.बी.एम.सी. यांना दिलेले अधिकार आणि प्राधिकरणाला कोणतीही बाधा न करता सदर करार रद्द करतील. आणि सदर ठेक्याचे काम पुर्ण करणे करीता अन्य लायसेन्सी/ठेकेदार यांना नियुक्त करतील.

ड) सदर करारनामा रद्द झालेवर एम.बी.एम.सी. ही तिचे प्रमाणकानुसार सदर लायसेन्सी/ठेकेदार यांचेकडून भरपाई म्हणून वसूल करावयाच्या रकमेचे मुल्यांकन करील. अशी रक्कम एम.बी.एम.सी. ही सदर यशस्वी निविदाधारक यांचे प्रतिभूती ठेव रकमेतून किंवा या कराराअंतर्गत यशस्वी निविदाधारक यांनी भरणा केलेल्या अन्य कोणत्याही रक्कमेतून किंवा एम.बी.एम.सी. यांचे बरोबर केलेला इतर करार किंवा ठेका व सामानाच्या जप्ती याद्वारे किंवा इतर मार्गाने वसूल करील.

**२१) ठेका पूर्णत: किंवा अंशत: मुदतीपुर्व रद्द करणे :-**

कोणत्याही वेळी महानगरपालिकेने जर सर्व किंवा कोणत्याही बस थांब्यावरील जाहिरातीच्या जागा (स्पेस) कोणत्याही कारणास्तव मागे घेणेचे ठरविल्यास आणि अशा कोणत्याही किंवा सर्व जागा जाहिरातीकरीता वापर करणे आवश्यक असल्यास अशावेळी महानगरपालिका एक महिना पूर्व सूचना देवून सदर करार मुदतीपूर्वी रद्द करील. अशाप्रकारे मुदतपुर्व करार रद्द करतेवेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार यांना सदर करार अकस्मात रद्द केल्याच्या कारणास्तव कोणत्याही भरपाईचा दावा करणेस अधिकार राहणार नाहीत. व करार खंडीत करणेच्या तारखेपर्यत वापरण्यात आलेल्या जाहिरातीचे जागेचे भाडे (जाहिरात फी) महानगरपालिकेस अदा करील.

**२२) वादाचा निवाडा :-**

एम.बी.एम.सी आणि लायसेन्सी/ठेकेदार यांचेमध्ये या करारा संबंधातील कोणत्याही प्रकरणावरुन कोणताही वाद निर्माण झाला किंवा सदर कराराच्या मुदतीमध्ये किंवा करार पुर्ण झाल्यावर कोणताही वाद निर्माण झाल्यास तो वाद समाधानाकरीता एक लवादाकडे लवाद कायद्यानुसार सुपुर्द करतील.

**२३) मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता मोफत जाहिरात जागा :-**

महानगरपालिका/शासकिय योजना तसेच महानगरपालिकेचा जनहिताचे योजनासाठी शासनाचे किंवा महानगरपालिकेचे कार्यक्रम असल्यास आयुक्त निर्देशीत करती अशा सहपत्र-२ मधील जागांपैकी जास्तीत जास्त ५% पर्यंतच्या जागांवर विनामुल्य जाहिरात करणे बंधनकारक राहील महानगरपालिका त्याबाबतचा कोणताही खर्च, कोणताही कर्मचारी वर्ग, वाहन, यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणार नाही.

**२४) बस थांब्यांवरील जाहिरातीं करीता विद्युत रोषणाई करीता लागू असलेल्या अटी :-**

१) जाहिरातदार हे भारतीय वीज कायदा आणि मान्य नकाशानुसार सर्व मॅटेलिक पार्टसना योग्य ती अर्थिंग देवून विद्युतीकरणाची उभारणी करून त्याची योग्य प्रकारे देखभाल करतील.

२) जाहिराती अंतर्गतचे सर्व लिखाण आणि जोडणी (फिटींगस) ही अभियंता यांनी दिलेल्या मान्यतेनुसार भारतीय ब्रिटिश दर्जाच्या उत्पादीत केलेल्या साहित्याद्वारे केले जातील.

३) ज्यावेळी कोणतेही वायरींग हे बाहय यांत्रिकी हानीचा विषय होत असेल किंवा लाकूड किंवा लोखंड इत्यादी पासून होणा-या हानीस लायसेन्सी/ठेकेदार जबाबदार राहील

४) सदर बस थांब्यावरील जाहिरातीं करीता विद्युत पुरवठा करणेसाठी एम.बी.एम.सी.ही रिलायन्स एनर्जीला ना-हरकत दाखला देईल.

५) दिलेले सर्व्हिस कनेक्शन ही सदर कराराच्या मुदतीत एम.बी.एम.सी. ची मिळकत असेल आणि त्यावर जाहिरातदार यांचा कोणताही दावा राहणार नाही. आणि सदर जाहिरातदार हे कराराचे मुदतीत देय दिनांकास विजेची बिल अदा करतील.

६) सदर लायसेन्सी/ठेकेदार हे एम.बी.एम.सी. यांनी मान्यता दिलेली प्रतिभूती ठेव रक्कम आणि सर्व्हिस कनेक्शनचे आकार हे अगोदर (ॲडवान्स मध्ये) अदा करतील. एम.बी.एम.सी. यांचे संबंधित कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी दिलेल्या सल्यानुसार जाहिरातदार हे स्वत: वीज मीटर घेतील आणि रिलायन्स एनर्जी यांचेकडून त्याची चाचणी करून घेतील. रिलायन्स एनर्जी यांनी दिलेले चाचणी प्रमाणपत्र हे फलकास रोषणाई करीताच्या अर्जासोबत एम.बी.एम.सी. यांचेकडे सादर केले पाहिजे.

७) प्रत्येक रोषणाई युक्त जाहिराती करीता (प्रति रोषणाई बस थांबे) निविदा रकमेच्या २०% जादा रक्कम ही दिलेल्या अनुसुची नुसार एम.बी.एम.सी. यांना दिली पाहिजे.

८) महानगरपालिकेच्या लेखी पूर्व परवानगीविना विद्युत उभारणी ही विद्युत पुरवठयास जोडली जाणार नाही आणि एम.बी.एम.सी. यांचे लेखी पूर्व मान्यतेविना विद्युत उभारणीत कोणतीही वाढ किंवा फेरफार केला जाणार नाही.

९) लायसेन्सी/ठेकेदार हे योग्य अशा शासनमान्य इलेक्ट्रीक कंपनीकडून सेट सहितच्या विद्युत उभारणीचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत. आणि सदर लायसेन्सी/ठेकेदार हे एजन्सीच्या खर्चाने त्याची देखभाल करतील. आणि नुतनीकरण करतील किंवा ते बदलतील. त्यानंतर त्यामध्ये ब्लोईग झाल्याने विजपुरवठा खंडीत झाल्यास अशावेळी एजन्सीच्या खर्चाने सदर विद्युत उभारणीची चाचणी/टेस्टींग करूनच पुरवठा पुर्नजोडणी करण्यांत येईल.

१०) कोणत्याही कारणामुळे वीजपुरवठयात बिघाड झाला, व्यत्यय आला किंवा विजपुरवठा ब्रेकडाउन झाल्यास सदर एम.बी.एम.सी. कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. तसेच वीजपुरवठयातील अशा बिघाडामुळे जाहिरात प्रदर्शनाबाबतची फी किंवा आकार परत केले जाणार नाहीत सदर करीता लायसेन्सी/ठेकेदार ही त्यांची पर्यायी व्यवस्था तयार ठेवतील.

**२५) बस थांब्यावरील जाहिरात अधिकाराकरीताच्या विशेष अटी :-**

१) एम.बी.एम.सी. यांनी निश्चित केलेल्या किंवा ठरवून दिलेल्या ठिकाणाच्या नियोजित रस्त्यावरील बस थांब्यांवर लायसेन्सी हे जाहिरात करतील.

२) लायसेन्सी/ठेकेदार यांना महसुल रक्कमेबाबतचे पत्र मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत बस थांब्यावरील जाहिराती करीता प्रथम(प्रथम हप्ता) अर्धवार्षिक महसूल रक्कम मनपात भरण्यात यावी. त्यानंतर दुसरा (दुसरा हप्ता) अर्धवार्षिक महसूल रक्कम सहा महिने पुर्ण होण्याच्या अगोदर भरण्यात यावा. तसे न केल्यास अट क्र.१.१० (ड) लागू होईल. त्यास लायसेन्सी/ठेकेदार बंधनकारक राहील.

३) प्रत्येक बस थांब्यावरील जाहिरात खाली मनपाने दिलेला जा.क्र./बस थांबा क्र./ठेकेदाराचे नांव व कालावधी यांची स्पष्ट दिसेल अशा अक्षरांमध्ये १X२ चौ. फूट क्षेत्रफळाचा फलक लावणे लायसेन्सी/ठेकेदार यांना बंधनकारक राहील.

४) लायसेन्सी मान्य करतो की, मुंबई मुद्रांक अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी भरण्याची जबाबदारी ही लायसेन्सी यांची राहील.

५) विषयांकित कामासंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास, ठाणे येथील मा. न्यायालयाचे अधिकार क्षेत्र राहील.

६) मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे लायसेन्सी/ठेकेदारांस बंधनकारक असेल व ठेकेदार ते मान्य करतात.

७) प्रवासी निवाऱ्यावर त्या बस थांब्याचे नांव लिहिण्याकरीता परिवहन सेवेच्या बोधचिन्हासह योग्य मापाचा बस मधील प्रवाशांना दृश्य होऊ शकेल अशा ठिकाणी फलक बसविण्याची व्यवस्था संबंधित निविदाकाराने करणे बंधनकारक राहील.

८) संबंधित थांब्यावरुन जाणाऱ्या बसेसचे मार्ग क्रमांक व वेळापत्रक लिहिण्याकरीता प्रवासी निवाऱ्याच्या दोन्ही बाजुस जाहिरात बोर्डालगत योग्य मापाचा बोर्ड लावण्याची व्यवस्था निविदाकाराने करावयाची आहे. किंवा डिजीटल बोर्ड लावण्याकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

९) महानगरपालिकेचे प्रवासी निवाऱ्याचे लायसन्स फी (असल्यास) व जाहिरात संबंधी इतर कर असल्यास ते कराराने दोन वर्षाच्या कालावधीमध्ये वेळोवेळी निविदाधारकाने संबंधित विभागाकडे स्वत: भरावयाचे आहेत.

१०) प्रवासी निवाऱ्याची /बस थांब्याची दुरुस्ती, देखभाल, परिरक्षण इ. बाबी निविदाकाराने स्वखर्चाने करावयाच्या आहेत. व प्रवासी निवारा स्वच्छ राहील व सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील. याबाबत हयगय, कसुर झाल्यास देणगीदाराची जाहिरात काढुन टाकली जाईल व सदर करारनामा रद्द केला जाईल व महानगरपालिका सदर प्रवासी निवारा ताब्यात घेईल. त्या प्रवासी निवाऱ्यावर स्वत: जाहिरात प्रदर्शित करण्यास अथवा अन्य कोणाचीही जाहिरात प्रदर्शित करण्यास महानगरपालिका प्राधिकृत राहील. याबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार ग्राह्य धरली/ स्विकारली जाणार नाही.

११) मा.महानगरपालिकेत लेखी मंजुरी दिल्याशिवाय प्रवासी निवाऱ्याच्या रचनेमध्ये कोणताही बदल, फेरबदल ठेकेदारास करता येणार नाहीत.

१२) प्रवासी निवाऱ्यावर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या जाहिरात या जाहिरात बोर्डाच्या आत सिमित राहतील याची दक्षता निविदाकाराने घ्यावयाची आहे. तशी न घेतल्यास महानगरपालिकेमार्फत जाहिरात बोर्ड उतरविले जातील. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी ही महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारे राहणार नाही. याबाबत सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची राहील.

१३) कंत्राटदाराने कोणत्या जाहिराती कोणत्या प्रवासी निवाऱ्यावर कुठे लावावयाच्या इत्यादीबाबत मा.आयुक्त किंवा त्यांनी त्यासंबंधी नेमुन दिलेले अधिकारी यांचेशी विचार विनिमय करावा, याबाबत कोणतेही फेरबदल हे मा.आयुक्त यांचे परवागीविना करता येणार नाहीत.

१४) भविष्यात बस थांब्याची संख्या वाढल्यास त्यावर सुध्दा जाहिरात करणे व त्यावेळेस जे दर लागु असतील त्या दराने बस थांब्यावर जाहिरात करणे बंधनकारक राहील.

१५) नमुद जाहिरातीकरीता देण्यांत आलेल्या सहपत्र - २ नुसार दिलेल्या यादी व्यतीरीक्त इतर बस निवाऱ्यावर जाहिरात करता येणार नाही, तसे केल्याचे महानगरपालिकेस आढळुन आल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही/ कारवाई केली जाईल.

**२६) बस थांब्यांवरील जाहिरात अधिकारा संबंधातील खास अटी :-**

अ) ठेक्याचे काळांत महानगरपालिकेस या कराराच्या अटीत कोणताही सुधार /फेरफार करणेचा अधिकार राहील. आणि सदर सुधार/बदला बाबत महानगरपालिका लायसेन्सी/ठेकेदार यांना सुचित करील, तसे करण्यास लायसेन्सी/ठेकेदार बंधनकारक राहील.

ब) ठेक्याची मुदत संपणे/मुदतीपुर्व समाप्त करणे/रद्द करतेवेळी सदर लायसेन्सी/ठेकेदार हे सदर साईटसचा शांततापुर्वक व खाली ताबा, कब्जा करार समाप्त झाल्यापासून ७ दिवसांत महानगरपालिकेस देतील. आणि लायसेन्सी/ठेकेदार यांनी सदर साईटसचा शांततापुर्वक व खाली ताबा कब्जा एम.बी.एम.सी.ला देणेस कसुर केल्यास, लायसेन्सी/ठेकेदार यांची ई.एम.डी. किंवा प्रतिभूती ठेव रक्कम जप्त होणेस पात्र राहील.



DPatil

क) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.जीईएम/१०९७/१६/प्र.क्र.३८/९७/नवि-२७/ दिनांक ०९ जुन २००३ मधील जाहिरातींचे नियम निविदाधारकास बंधनकारक राहिल.

ड) नगरसेवक/आमदार/खासदार यांचे निधितुन उभारले गेलेले बस थांब्यांवर त्या संबंधित नगरसेवक/आमदार/खासदार यांचे नावाचा २ X १ चौ.फुट आकारमानाचा फलक लावण्यांत यावा.

एम.बी.एम.सी. यांचेकडे निविदा फॉर्म सोबत सादर केलेले सर्व दस्तऐवज व निविदा हे या कराराचा/ठेक्याचा एक भाग मानला जाईल. त्याचे तंतोतंत पालन करणे लायसेन्सी/ठेकेदार ची जबाबदारी राहील.

यातील साक्षीत नमुद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात १५ फेब्रुवारी दिवशी आणि २०१६ वर्षी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

यांतील नमुद केलेले पहिले पक्षकार
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
यांचे करीता आयुक्त
यांनी समक्ष सही केली आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.
15/02/16

**साक्षीदार**

१) संपूर्ण नांव व पत्ता
भ्र.क्र.

२) संपूर्ण नांव व पत्ता
भ्र.क्र.

यांतील नमुद केलेले दुसरे पक्षकार
**मे. आदित्य ॲडव्हर्टायझर्स**
बी/१०२, रिद्धीसिद्धी कॉम्प्लेक्स,
एम.जी.रोड, बोरिवली पुर्व,
मुंबई ४०० ०६६.
यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

For Aditya Advertisers
Authorised Signatory

मे. आदित्य ॲडव्हर्टायझर्स
(लायसेन्सी /ठेकेदार/बिडर्स)

साक्षीदार :-

१) संपूर्ण नांव व पत्ता
भ्र.क्र.

२) संपूर्ण नांव व पत्ता
भ्र.क्र.

YCE

## सहपत्र-२

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत उभारणेत आलेले रस्त्यालगत उभारणेत आलेले बस थाबांच्या ठिकाणांची यादी खालीलप्रमाणे

| अ.क्र. | बस थांब्याचे स्थळ | आकारमान |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड, वामनस्मृती जवळ | ७.०० मी X १.०५ मी. |
| २ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड,व्हिनस अपार्टमेंट | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३ | भाईंदर (प.) प्रकाश मार्केट समोर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ४ | भाईंदर (प.) उत्तन रस्ता (मराठी शाळेजवळ) | ७.०० मी X १.०५ मी. |
| ५ | मिरा रोड (पूर्व) मंगलनगर बस स्टॉप क्र.१५ | ७.०० मी X १.०५ मी. |
| ६ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड,सीता नगर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ७ | भाईंदर (पूर्व) नवघर रोड,सोनूबाई निवास समोर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ८ | उत्तन नाका | ७.०० मी X १.०५ मी. |
| ९ | मोर्वा गाव | ७.०० मी X १.०५ मी. |
| १० | मिरारोड मेडतीया नगर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ११ | मिरा रोड सिता पार्क लोढा पार्क रोड | ७.०० मी X १.०५ मी. |
| १२ | मिरा रोड रसाझ सिध्दार्थ नगर | ७.०० मी X १.०५ मी. |
| १३ | भाईंदर (प.) आंबेडकर रोड | ७.०० मी X १.०५ मी. |
| १४ | भाईंदर (पूर्व) रेल्वे स्टेशन जवळ, टी.एम.टी तीन बस स्टॉप | ७.०० मी X १.०५ मी. |
| १५ | राईगाव | ७.०० मी X १.०५ मी. |
| १६ | मुर्धा गाव | ७.०० मी X १.०५ मी. |
| १७ | भाईंदर (प.) पोलिस चौकी | ७.०० मी X १.०५ मी. |
| १८ | भाईंदर (पू.) पोलीस चौकी (ठाणे रोड क्रॉसच्या बाजुला | ७.०० मी X १.०५ मी. |
| १९ | भाईंदर (प.) डोंगरी आनंदनगर | ७.०० मी X १.०५ मी. |
| २० | भाईंदर (प.) डोंगरी येथील कुंभार्डे दत्तमंदिर | ७.०० मी X १.०५ मी. |
| २१ | भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल | ७.०० मी X १.०५ मी. |
| २२ | भाईंदर (प.) राई शिवनेरी | ७.०० मी X १.०५ मी. |
| २३ | भाईंदर (पूर्व) बी.पी. रोड कॉंग्रेस आफीस जवळ | ७.०० मी X १.०५ मी. |
| २४ | भाईंदर (पूर्व) रेल्वे स्टेशन जवळील प्रशांत हॉटेल जवळ | ७.०० मी X १.०५ मी. |
| २५ | मिरा रोड (पूर्व) निलम पार्क इमारतीजवळ (लोढा रस्ता) | ७.०० मी X १.०५ मी. |
| २६ | मिरा रोड (पूर्व) नरेंद्र पार्क | ७.०० मी X १.०५ मी. |
| २७ | मिरा रोड (पूर्व) इंदिरा गांधी हॉस्पीटल जवळ (पुनमसागर रस्ता) | ७.०० मी X १.०५ मी. |
| २८ | मिरा रोड (पूर्व) जैन मंदिर गेट जवळ शांतीनगर सेक्टर-३ | ७.०० मी X १.०५ मी. |
| २९ | मिरा रोड (पूर्व)अलाहाबाद बँकेसमोर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३० | मिरा रोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर-६, इमारत क्र.ओ/४ समोर | ७.०० मी X १.०५ मी. |

| अ.क्र. | बस थांब्याचे स्थळ | आकारमान |
|---|---|---|
| ३१ | ठाणे घोडबंदर रस्त्यावर सुरक्षा कंपनीजवळ/काजुपाडा (मुंबई कडे जाणारा) | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३२ | मिरा रोड (पूर्व) अजित पॅलेस | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३३ | ठाणे घोडबंदर रोड रस्त्यावर चेणा ब्रिज (बोरीवली कडे जाणारा) | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३४ | रा.म.क्र.८ वर लक्ष्मी बाग (बोरीवली कडे जाणारा) | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३५ | रा.म.क्र.८ वर फाऊंटन हॉटेल समोर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३६ | काशिमीरा पोलीस स्टेशन समोर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३७ | भाईंदर (प.) बॉम्बे मार्केट | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३८ | भाईंदर (प.) क्रॉस गार्डन | ७.०० मी X १.०५ मी. |
| ३९ | भाईंदर (प.) जैन मंदिर | ७.०० मी X १.०५ मी. |
| ४० | भाईंदर (प.) एम.टी.एन.एल./विजय बँक | ७.०० मी X १.०५ मी. |
| ४१ | भाईंदर (प.) व्यंकटेश हॉल ब्रीज जवळ | ७.०० मी X १.०५ मी. |
| ४२ | भाईंदर (प.) इंदिरा मार्केट | ७.०० मी X १.०५ मी. |